सेवानिवृत्त शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना शासकीय सेवेत असताना केलेल्या अत्युत्कृष्ठ कामाबद्दल आगाऊ वेतनवाढ/वेतनवाढी मंजूर करण्याबाबत.

---

**महाराष्ट्र शासन,**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक:आवेवा-1093/(प्र.क्र.95/93)/आठ,
मंत्रालय, मुंबई 400 032. दिनांक 4 ऑगस्ट 1994.

**वाचा:-** (1) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: एसआरव्ही-1069/डी, दिनांक 26 जून 1970.

(2) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: एसआरव्ही-1072/डी, दिनांक 11 फेब्रुवारी 1974.

(3) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: एसआरव्ही-1081/1433/प्र.क्र.119/आठ, दिनांक 24 डिसेंबर 1981.

(4) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: एसआरव्ही-1089/2829/प्र.क्र.406/आठ, दिनांक 4 एप्रिल 1990.

(5) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: आवेवा-1089/44/प्र.क्र. 13/आठ, दिनांक 2 जून 1990.

(6) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: आवेवा-1090/प्र.क्र.152/आठ, दिनांक 29 ऑक्टोबर 1990.

**शासन निर्णय:-** शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना शासकीय सेवेत असताना केलेल्या अतिउत्कृष्ठ कामाबद्दल आगाऊ वेतनवाढ/वाढी चा मूळ उद्देश सेवेत असलेल्या अधिका-यांना/कर्मचा-यांना प्रोत्साहन मिळणे असा आहे. या योजनेचा हा मूळ उद्देश लक्षात घेता सेवानिवृत्त शासकीय कर्मचा-यांना/अधिका-यांना आगाऊ वेतनवाढ मंजूर करणे अपेक्षित नाही. परंतु शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, आगाऊ वेतनवाढीचे प्रस्ताव संबंधित प्रशासकीय कार्यालय/विभाग यांच्याकडून वेळच्यावेळी तपासले जाऊन तत्संबंधीचे आदेश निर्गमित न केल्यामुळे आणि दरम्यानच्या कालावधीत आगाऊ वेतनवाढीसाठी पात्र असलेले अधिकारी/कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यामुळे ते शासकीय सेवेत असताना केलेल्या अत्युत्कृष्ठ कामाबद्दल मिळणा-या आगाऊ वेतनवाढीपासून वंचित राहतात. सेवानिवृत्त झालेल्या अधिका-यांना/कर्मचा-यांना शासकीय सेवेत असताना त्यांनी केलेल्या अत्युत्कृष्ठ कामाबद्दल सेवानिवृत्तीनंतरही त्यांना अनुज्ञेय असलेल्या दिनांकास आगाऊ वेतनवाढ मंजूर करावी किंवा कसे हा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. त्यासंबंधात सम्यक विचार करुन शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, ज्या सेवानिवृत्त अधिका-यांना/कर्मचा-यांना त्यांनी शासकीय सेवेत असताना केलेल्या अत्युत्कृष्ठ कामाबद्दल अनुज्ञेय असलेल्या दिनांकास वेतनवाढ/वेतनवाढी मिळणे अपेक्षित होते, परंतु प्रशासकीय विलंबामुळे ते सेवानिवृत्त होईपर्यन्त तत्संबंधीचे आदेश निर्गमित होऊ शकले नाहीत, त्यांना त्यांच्या सेवानिवृत्तीपूर्वीच्या अनुज्ञेय आगाऊ वेतनवाढ/वेतनवाढी मंजूर करण्यास खाली नमूद केलेल्या अटींच्या अधिनस्त मान्यता देण्यात येत आहे:-

(1) सेवानिवृत्त शासकीय कर्मचा-यास/अधिका-यास सेवानिवृत्तीपूर्वीच्या अनुज्ञेय दिनांकापासून आगाऊ वेतनवाढ/

शामुमु-रोटा-साप्रवि-एच-1072(4,000-9-94)-1.

जिल्हाधिकारी कार्यालय
रत्नागिरी
21 JAN 1995
शाखा-
प्र. लि. नि. जिल्हाधिकारी

वेतनवाढी मंजूर करताना संबंधित संवर्गातील 5 टक्के ही विहित कमाल मर्यादा ओलांडली जाणार नाही, याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

(2) ज्या दिनांकापासून सेवानिवृत्त शासकीय कर्मचा-याला/अधिका-याला आगाऊ वेतनवाढ/वेतनवाढी मंजूर करावयाच्या आहेत त्या दिनांकाच्या 3 वर्षापर्यन्तच्या काळानंतर आगाऊ वेतनवाढ/वेतनवाढीच्या प्रस्तावाची छाननी करण्यात आल्यास आणि दरम्यानच्या काळात सदर शासकीय कर्मचारी/अधिकारी सेवानिवृत्त झाल्यास सदर कर्मचा-यास/अधिका-यास प्रस्तावीत दिनांकापासून आगाऊ वेतनवाढ/वेतनवाढी मंजूर करण्यात याव्यात. थोडक्यात, सेवानिवृत्त शासकीय कर्मचारी/अधिकारी यांना अनुज्ञेय दिनांकापासून आगाऊ वेतनवाढ/वेतनवाढी मंजूर करताना जास्तीत जास्त 3 वर्षापर्यन्त प्रशासकीय विलंब झाला असल्यास अशा प्रकरणांचा विचार करावा. "प्रशासकीय विलंब" याची व्याख्या विभागीय अथवा मध्यवर्ती समितीच्या सदस्यांच्या कार्यबाहुल्यामुळे सदरहू समितीची बैठक वेळच्यावेळी न होता, उशीरा होणे एवढ्या पुरतीच मर्यादित आहे. इतर कोणत्याही कारणामुळे विलंब झाल्यास त्यास प्रशासकीय विलंब म्हणता येणार नाही.

(3) शासकीय सेवेत असणारा शासकीय कर्मचारी/अधिकारी डावलून सेवानिवृत्त शासकीय अधिका-याला/कर्मचा--याला आगाऊ वेतनवाढ/वेतनवाढी देण्यात येऊ नयेत.

2. हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक: 388/94/सेवा-3, दिनांक 24 मार्च 1994 अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**य.मा. जोशी,**
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति